पुण्य नगरी



# केंद्राच्या पथकाने घेतला कांदा लागवड, दराचा आढावा !

## कृषी, शेतकरी कल्याण विभागातील अधिकारी लासलगावी!

**लासलगाव :** कांदा पिकाचे क्षेत्र, अंदाजित उत्पादन व सद्यस्थितीतील बाजारपेठेतील आवक, बाजारभाव तसेच निर्यात विषयक धोरण आणि शेतकरी व व्यापारी वर्गाच्या समस्यांविषयी चर्चा करणेसाठी केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागातील अधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि. २६) लासलगाव बाजार समितीस भेट दिली.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागातील विपणन विभागाचे अतिरिक्त अर्थ सल्लागार कविरासन के. यांच्यासह विपणन व तपासणी संचालनालयाच्या विपणन अधिकारी सोनाली बागडे, एनएचआरडीएफचे सहायक संचालक डॉ. सुजय पांडे, पणन मंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयाचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी व विभागीय व्यवस्थापक बहादुर देशमुख, नाशिक जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाचे उपसंचालक जगदीश पाटील, निफाड तालुक्याचे कृषी अधिकारी सुधाकर पवार यांचा शिष्टमंडळात समावेश होता. याप्रसंगी अधिकाऱ्यांनी बाजार समितीचे सदस्य, शेतकरी प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा करत कांदा आवक, उत्पादन खर्च व दराबाबत चर्चा केली. लासलगाव व मुंबई बाजार समितीचे सदस्य जयदत्त होळकर यांनी शिष्टमंडळास चालु वर्षी खरीप कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणावर झालेली असून नाशिक जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांत व राज्यात लवकरच लाल कांदा विक्रीस येणार असल्याचे सांगितले.

बाजार समितीचे सदस्य व कांदा निर्यातदार प्रवीण कदम आणि मनोज जैन यांनी केंद्र शासनाकडून वेळोवेळी कांदा निर्यातीवर लादण्यात येणाऱ्या प्रतिबंधांमुळे कांदा व्यापाऱ्यांना समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे बाजार समितीचे सदस्य तथा शेतकरी प्रतिनिधी संदीप दरेकर यांनी शेतकरी बांधवांसाठी लागणारे बि-बियाणे, औषधे, रासायनिक खते, इंधन व शेती औजारांवरील वस्तु व सेवाकर कमी अथवा रद्द करणेबाबत मागणी केली. यावेळी बाजार समितीच्या वतीने शिष्टमंडळातील प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत, सहायक सचिव सुरेश विखे, सुशिल वाढवणे, पंकज होळकर, संदीप होळकर, राहुल शेजवळ, गणेश आहेर, सचिन वाघ, संदीप शेलार आदी उपस्थित होते.

Nashik Edition
Sep 27, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

Agrowon, Dt. 27/09/2024

# लासलगाव बाजार समितीत शेतीमाल तारण कर्ज योजना सुरू

## क्षीरसागर : आर्थिक नुकसान टाळण्यासाठी निर्णय

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : निफाड तालुक्यात खरीप हंगामातील मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी व करडई काढणीचे काम सुरू झाले असून शेतकरी बांधवांचा सदर शेतीमाल एकावेळी बाजार आवारावर विक्रीस येत असल्यामुळे बाजारभाव कमी होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने दरवर्षीप्रमाणे २०२४- २५ या हंगामाकरिता शेतीमाल तारण कर्ज योजना सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी दिली.

बाजार समितीने २०२४-२५ या हंगामाकरिता मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी व करडई या प्रमुख शेतीमालासाठी तारण कर्ज योजना राबविणार आहे. त्यानुसार या योजनेअंतर्गत फक्त उत्पादक शेतकऱ्यांचाच माल तारणात ठेवला जाणार आहे. शासकीय प्रतवारीकार व बाजार समितीचे प्रतवारीकार यांनी संयुक्तरीत्या शिफारस केलेला मका, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी, बाजरी व करडई हा शेतीमाल ज्या दिवशी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात तारण म्हणून ठेवला जाईल. त्या दिवसाचे सरासरी बाजारभाव किंवा त्या मालाचे किमान आधारभूत दर यापैकी जे कमी असेल ते विचारात घेऊन बाजार समिती वखार महामंडळाचे पावतीप्रमाणे स्वनिधीतून संबंधित शेतकऱ्यास धनादेशाद्वारे रक्कम अदा करणार आहे. एकूण किमतीच्या ७५ टक्के रक्कम तारण कर्ज म्हणून ६ महिन्यांचे मुदतीने ६ टक्के व्याजदराने शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार असल्याचेही सभापती क्षीरसागर यांनी सांगितले.



Sakal, Dt. 26/09/224

# देशात यंदा विक्रमी धान्योत्पादन...!

## कृषी मंत्रालयाच्या वतीने सुधारित अंदाज जाहीर

■ सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. २५ : केंद्र सरकारने २०२३-२४ मधील धान्योत्पादनाचा सुधारित आणि अंतिम अंदाज जाहीर करताना यंदाही धान्याची कोठारे भरलेली राहतील, असा संदेश दिला आहे. या वर्षात ३३.२२ कोटी टन विक्रमी धान्योत्पादनाचा अंदाज कृषी मंत्रालयाने वर्तविला आहे. यामध्ये गहू, तांदूळ तसेच तेलबियांचे उत्पादन उच्चांकी असेल.

राज्यांकडून आलेल्या धान्योत्पादनाच्या आकडेवारीच्या आधारे कृषी मंत्रालयाने जाहीर केलेल्या सुधारित आणि अंतिम अंदाजानुसार यंदा गहू आणि तांदळाचे उत्पादन अनुक्रमे ११.३२ कोटी टन आणि १३.७८ कोटी टन असे उच्चांकी



राहील. यासोबतच मोहरीचे उत्पादन देखील १.३२ कोटी टनांपर्यंत जाईल.

मागील वर्षी महाराष्ट्रासह दक्षिण भारतातील राज्यांमध्ये दुष्काळी स्थिती होती. तसेच राजस्थानात ऑगस्ट महिन्यात पावसाने पाठ फिरवली होती. त्यामुळे रब्बी हंगामावर परिणाम झाल्याने कडधान्य, भरडधान्य, सोयाबिन आणि कापूस उत्पादनावर परिणाम झाला होता. असे असले तरी यंदा अन्नधान्याचे उत्पादन वाढीव राहील असे सरकारचे म्हणणे होते.

### मागील वर्षाच्या तुलनेत २६.११ लाख टनाची वाढ

२०२२-२३ - ३२.९६ कोटी टन धान्योत्पादन झाले होते. त्यातुलनेत यंदाची वाढ तब्बल २६.११ लाख टनांची असून तांदूळ, गहू आणि श्रीअन्नाच्या (तृणधान्य) उत्पादनात वाढ झाल्यामुळे हा उच्चांक गाठण्यात यश आल्याचे कृषी मंत्रालयाचे म्हणणे आहे. यामध्ये गव्हाचे उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत यंदा २७.३८ लाख टनांनी तर तांदळाचे उत्पादन २०.७० लाख टनांनी वाढीव आहे. याखेरीज श्रीअन्नाचे उत्पादन मागील वर्षी १.७३ कोटी टन झाले होते. यंदाच्या सुधारित अंदाजानुसार श्रीअन्न उत्पादन १.७५ कोटी टनांवर जाणार आहे.



Agrowon, Sept. 2024

# बेदाण्याची ४५ हजार टन निर्यात

## राज्यातील स्थिती ; बेकरी पदार्थांसाठी मागणीत वाढ, यंदाही निर्यात वाढेल



**अभिजित डाके : ॲग्रोवन वृत्तसेवा**

> जगभरातून बेकरी पदार्थ उत्पादनांत बेदाण्याचा वापर केला जात असल्याने बेदाण्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे राज्यातून दर्जेदार बेदाणा निर्यातीसाठी मोठ्या संधी आहेत. त्यादृष्टीने शेतकरीही पुढाकार घेत आहेत.
>
> – **प्रतापसिंह चव्हाण**, बेदाणा निर्यातदार

> दोन वर्षांपासून राज्यातून निर्यातीचा आलेख वाढत असल्याने ही बाब चांगली आहे. गतवर्षी जगभरातील बाजारपेठेत दरही अपेक्षित मिळाले होते. यंदा निर्यात वाढेल असा अंदाज आहे.
>
> – **विजय पाटील**, बेदाणा निर्यातदार

सांगली : इराण आणि तुर्की या देशांतील बेदाणा जगभरात सर्वाधिक निर्यात होतो. मात्र गतवर्षी इराण, तुर्की या देशांतील बेदाण्याचे उत्पादन ६० टक्क्यांनी घटले. परिणामी, जगभरातून महाराष्ट्रातील बेदाण्याला मागणी वाढली. यामुळे गतवर्षी राज्यातून ४५ हजार ४३६ टन बेदाण्याची निर्यात झाली. २०२२-२३ च्या तुनलेत १९ हजार २१५ टनांनी निर्यात वाढली असल्याची माहिती बेदाणा उद्योगातील जाणकारांनी दिली.

राज्यातून सुमारे ११४ देशांत बेदाण्याची निर्यात होते. प्रामुख्याने मोरोक्को, रोमानिया, रशिया, सौदी अरब, व्हिएतनाम, श्रीलंका, इंडोनेशिया देशांतून महाराष्ट्रातील बेदाण्याला मागणी आहे. त्यामुळे राज्यातून या सात देशात सर्वाधिक बेदाण्याची निर्यात होते. राज्यातून चॉकलेटी आणि काळा बेदाणा प्रामुख्याने निर्यात होतो. हा निर्यात होणारा बेदाणा बेकरी पदार्थांसाठी वापरला जातो. बेदाणा बेकरी पदार्थांसाठी वापरण्याचे प्रमाण अधिक असल्यामुळे बेदाण्याला मागणी चांगली आहे. त्यामुळे राज्यातून दरवर्षी कमीअधिक प्रमाणातला बेदाणा निर्यात केला जातो. जगभरातील बाजारपेठेत इराण, तुर्की या देशांतून सर्वाधिक बेदाणा निर्यात केला जातो. मात्र गेल्या वर्षी या दोन्ही देशांत बेदाणा निर्मितीसाठी पोषक वातावरण नसल्याने सुमारे ६० टक्के उत्पादन घटले असल्याचे निर्यातदारांनी सांगितले. परदेशातून बेकरी पदार्थांमध्ये वापरण्यासाठी मागणी वाढल्याने बेदाण्याचा उठाव होऊ लागला आहे. यामुळे गेल्या तीन वर्षांपासून यामुळे बेदाण्याची निर्यातीत वाढ झाली आहे. २०२२-२३ मध्ये २६ हजार २२० टन तर २०२३-२४ मध्ये ४५ हजार ४३५ टन निर्यात झाली. दोन वर्षांपूर्वीच्या तुनलेत गतवर्षी १९ हजार २१५ टनांनी निर्यात वाढली आहे.

देशातून गतवर्षी ४७ हजार ७५० टन बेदाण्याची निर्यात झाली आहे. त्यापैकी राज्यातून ४५ हजार ३३५ टन बेदाणा सात समुद्रापार पोहोचला आहे. देशातून होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी ८० ते ८५ टक्के वाटा हा महाराष्ट्राचा आहे.

**राज्यातून बेदाणा निर्यात झालेला दृष्टिक्षेप**

| वर्ष | निर्यात टनात |
|---|---|
| २०२१-२२ | १७७४०.६० |
| २०२२-२३ | २६२२०.८४ |
| २०२३-२४ | ४५४३५.९१ |

**देशातून बेदणा निर्यात झालेला दृष्टिक्षेप**

| वर्ष | निर्यात टनांत |
|---|---|
| २०२१-२२ | १९५२०.६७ |
| २०२२-२३ | २७६४०.५८ |
| २०२३-२४ | ४७७५०.६० |

Agrowon, Dt. 26/09/2024

# अफगाणिस्तानचा कांदा भारतामध्ये दाखल

## मागणीच्या तुलनेत आयात नगण्य; ग्राहकांची पसंतीही कमी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : एकीकडे केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार मंत्रालयाने भाव स्थिरीकरण योजनेअंतर्गत पावणेपाच लाख टन कांदा खरेदी केला. हा बफर साठा टप्प्याटप्प्याने देशाच्या विविध बाजारांत पाठविला जात आहे. मात्र अशातच अफगाणिस्तानचा कांदा बाजारात दाखल झाला आहे. मात्र मागणीच्या तुलनेत आयात नगण्य आहे. तर भारतीय कांद्याच्या स्पर्धेत गुणवत्ता व प्रतवारी नसल्याने ग्राहकांची कमी असल्याचे समोर आले आहे.

केंद्र सरकारच्या हस्तक्षेपामुळे कांदा उत्पादकांची गेल्या वर्षीपासून मोठी आर्थिक कोंडी झाली. त्यात आवक कमी झाल्याने गेल्या दीड महिन्यापासून कांद्याच्या दरात सुधारणा आहे. सध्या मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याने पुरवठा घटला आहे. त्यामुळे पुन्हा कांद्याची उपलब्धता होण्यासह कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी कांद्याच्या आयातीसाठी परवानगी दिली आहे. त्यानुसार अफगाणिस्तानमधील उत्पादित कांदा पंजाबमधील अमृतसर, जालंधर बाजारात दाखल झाला आहे. मात्र मागणीच्या तुलनेत त्याची उपलब्धता कमी असल्याचे अमृतसरमधील कांदा व्यापाऱ्यांनी 'ॲग्रोवन'शी बोलताना सांगितले. जवळपास दहा ट्रक कांदा उपलब्ध झाला आहे. तर ५० च्या जवळपास कांदा ट्रक उपलब्ध होतील.



यापूर्वी केंद्र सरकारने खरेदी भाव स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत खरेदी केलेला कांदा विविध शहरांमध्ये सध्या प्रतिकिलो ३५ रुपये प्रमाणे किरकोळ विक्री होत आहे.

सरकारकडील बफर साठा अद्याप संपलेला नसताना केंद्राने अफगाणिस्तानच्या कांद्याला देशांतर्गत येऊ देऊन पुन्हा कांदा उत्पादकांसमोर अडचणी निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला, असा संताप शेतकरी वर्गात आहे. एकीकडे भारतीय निर्यातदारांना अटी शर्तींची अडकाठी घालून अप्रत्यक्ष कांदा निर्यातबंदी कायम आहे. मात्र अफगाणिस्तानच्या कांद्याला पायघड्या का? असा सवाल कांदा उत्पादक शेतकऱ्यांमधून उपस्थित होत आहे.

### दरावर फारसा फरक नाही

अफगाणिस्तानच्या कांद्याची भारतामध्ये आयात होत आहे, मात्र त्याचा पुरवठा फक्त पंजाब राज्यापुरता मर्यादित आहे. तर देशातील इतर बाजारपेठांमध्ये उन्हाळ कांद्याला मागणी कायम आहे. तर नव्या खरीप कांद्याचे पीक अद्यापही मागणीच्या तुलनेत काढण्यासाठी नसल्याने सध्या दरावर फारसा परिणाम नाही, अशी स्थिती आहे. मात्र सरकारच्या फक्त ग्राहकधार्जिण्या भूमिकांमुळे बाजारात गोंधळ निर्माण करण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न झाल्याचे बोलले जात आहे.

Pudhari, Dt. 20/09/2024

# संत्रा प्रक्रिया केंद्राचे प्रस्ताव ३० सप्टेंबरपर्यंत स्वीकारणार : कदम

**पुणे :** आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्याची १७ सप्टेंबरपर्यंत असलेली मुदत वाढविण्याचा निर्णय राज्य कृषी पणन मंडळाने घेतला आहे. त्यानुसार अधिकाधिक इच्छुक लाभार्थ्यांनी आता निश्चित केलेल्या अंतिम मुदतीत म्हणजे ३० सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे. त्याबाबतची सूचना पणन मंडळाच्या संकेतस्थळावर अपलोड केली आहे. योजनेच्या अधिक माहितीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुख्यालयाच्या प्रकल्प विभागाशी संपर्क साधावा. राज्य शासनाने राज्याच्या नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल व कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूरमध्ये आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या योजनेला २७ डिसेंबर २०२३ च्या शासन निर्णयाअन्वये मान्यता दिली आहे. तसेच, २० कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. योजनेच्या लाभार्थींमध्ये सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, खासगी उद्योजक आणि बाजार समितीचा समावेश आहे. यापैकी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने पहिल्या टप्प्यात प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाकरिता लाभार्थी निवडीची प्रक्रिया दिनांक १२ जुलै २०२४ रोजी जाहिरात देऊन सुरू केलेली आहे. या प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागविण्याकरिताचा निविदा, तसेच मॉडेल प्रकल्प अहवाला पणन मंडळाच्या www.msamb. com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी कळविले आहे.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# संत्रा प्रक्रिया केंद्राचे प्रस्ताव ३० सप्टेंबरपर्यंत स्वीकारणार : कदम

**पुणे** : आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी योजनेंतर्गत प्रस्ताव सादर करण्याची १७ सप्टेंबरपर्यंत असलेली मुदत वाढविण्याचा निर्णय राज्य कृषी पणन मंडळाने घेतला आहे. त्यानुसार अधिकाधिक इच्छुक लाभार्थ्यांनी आता निश्चित केलेल्या अंतिम मुदतीत म्हणजे ३० सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे. त्याबाबतची सूचना पणन मंडळाच्या संकेतस्थळावर अपलोड केली आहे. योजनेच्या अधिक माहितीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुख्यालयाच्या प्रकल्प विभागाशी संपर्क साधावा. राज्य शासनाने राज्याच्या नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल व कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूरमध्ये आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या योजनेला २७ डिसेंबर २०२३ च्या शासन निर्णयाअन्वये मान्यता दिली आहे. तसेच, २० कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. योजनेच्या लाभार्थींमध्ये सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, खासगी उद्योजक आणि बाजार समितीचा समावेश आहे. यापैकी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने पहिल्या टप्प्यात प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाकरिता लाभार्थी निवडीची प्रक्रिया दिनांक १२ जुलै २०२४ रोजी जाहिरात देऊन सुरू केलेली आहे. या प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागविण्याकरिताचा निविदा, तसेच मॉडेल प्रकल्प अहवाला पणन मंडळाच्या www.msamb. com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी कळविले आहे.

Pune Edition
Sep 20, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# भारतीय भाज्यांची विदेशात चलती!

## महाराष्ट्रातून अडीच हजार, तर देशातून साडेआठ हजार कोटींच्या भाजीपाल्याची निर्यात

पुढारी विशेष

किशोर बरकाले
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : देशातून आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २६ लाख ३५ हजार मेट्रिक टनाइतक्या भाजीपाल्याची निर्यात झाली असून त्यापोटी ८ हजार ६६१ कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त झाले आहे. त्यापैकी महाराष्ट्रातून ८ लाख ७२ हजार मेट्रिक टन भाजीपाला निर्यात होऊन त्यातून २ हजार ५१९ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळाले असून भारतीय भाज्यांची चव परदेशातील ग्राहकांच्या जिभेवर रेंगाळत आहे.**



**पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रावर आवश्यक त्या प्रक्रिया करून भाज्यांची निर्यात केली जाते.**

राज्यातून गतवर्षात कांद्याची ७ लाख ५० हजार टनाइतकी निर्यात झाली असून १ हजार ६७८ कोटींचे परकीय चलन प्राप्त झाले आहे. भाज्यांची झालेली निर्यात प्रामुख्याने आखाती देश, मलेशिया, सिंगापूर, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, इंग्लंड व अन्य देशांना होते. तसेच परदेशात भारतीय वंशाच्या लोकांची जिथे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या आहे, अशा देशांतही होत असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळातून देण्यात आली.

राज्यातील भाजीपाला निर्यातीमध्ये प्रामुख्याने कांदा, भेंडी, कारले, वांगी, टोमॅटो, कोबी, दुधी भोपळा, शेवगा, तोंडली, हिरवी मिरची, घेवडा, कडीपत्ता, पडवळ आणि बटाटा आदींचे प्रमाण अधिक आहे. भारताच्या जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यत्वामुळे आणि कृषी क्षेत्राच्या जागतिक व्यापारामधील समावेशामुळे फळांच्या निर्यातीमध्ये चांगल्या संधी निर्माण झालेल्या आहेत. भारतातून ताज्या भाजीपाल्याची १३७ देशांना निर्यात केली जाते.

पणन मंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प तथा मॅग्रिट प्रकल्पामार्फत हिरवी मिरची, भेंडी, पडवळ व लिंबू इत्यादी भाजीपाल्याकरिता मूल्य साखळी (व्हॅल्यू चेन) विकसित करण्याचे काम सुरू असल्याची माहिती मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली.

> “ राज्यात भाजीपाला निर्यात वाढीसाठी राज्य कृषी पणन मंडळाने ४५ विविध निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत, ज्याचा उपयोग शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, निर्यातदार व स्थानिक व्यापारी यांनी करून भाजीपाला निर्यात करत आहेत. या सुविधांमुळे शेतमाल आयात करणाऱ्या देशांना त्यांच्या मानांकनानुसार तेथील ग्राहकांना गुणवत्तापूर्ण, योग्य पॅकिंग, कीड व रोगमुक्त शेतमालाची हमी मिळते. त्यामुळे देशातील एकूणच शेतमाल निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा अग्रस्थानी राहण्यास मदत होऊन येथील शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होत आहे.
>
> - **संजय कदम,** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,पुणे.

### तिखट मिरचीचा ठसका परदेशातील ग्राहकांना गोड

चवीने तिखट असलेल्या हिरव्या मिरचीचा ठसका परकीय ग्राहकांना अधिक गोड लागत असल्याचे चित्र आहे. कारण भाज्यांमध्ये ४८ हजार ४३४ मेट्रिक टनाइतकी निर्यात ही हिरव्या मिरचीची झाली असून त्यातून देशाला ३७८ कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त झाले आहे. अन्य भाज्यांमध्ये लसूण ६ हजार ९२१ मे. टन, टोमॅटो १७ हजार ५९६ मे. टन, भेंडी ३ हजार ८६३ मे. टन, काकडी ७५५ मे. टन, दुधी भोपळा ५०४ मे. टन आणि १२२ मे. टन कारल्याचा समावेश आहे.

Punyanagari, Dt. 12/09/2024

# बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीत रेशीमकोष खरेदी-विक्री खुली बाजारपेठ केंद्र सुरू

**ई-नामद्वारे ऑनलाइन पद्धतीने लिलावामुळे पारदर्शक व्यवहार**

**बारामती : प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य मार्केटयार्ड येथे रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने रेशीमकोष खरेदी-विक्री खुली बाजारपेठ केंद्र सुरू असून, रेशीमकोष मार्केटमध्ये ई-नामद्वारे ऑनलाइन पद्धतीने लिलाव होत असल्याने योग्य दर, अचूक वजन व वेळेत व खात्रीशीर पेमेंट मिळत असल्याने रेशीमकोष मार्केटमध्ये पारदर्शक व्यवहार होत आहेत.

यामुळे शेतकऱ्यांची विश्वासार्हता वाढत चालली असून, शेतकऱ्यांना वेळेत ऑनलाइन पेमेंट मिळत असल्याने परिसरातील व आसपासच्या जिल्ह्यातील रेशीमकोष उत्पादक शेतकरी बारामती मार्केटमध्ये कोष विक्रीस आणत आहेत. परंतु, खुली बाजारपेठ विक्री व्यवस्था असतानाही काही खरेदीदार परस्पर अनधिकृतपणे शेतकऱ्यांकडून दर ठरवून कोष खरेदी करीत आहेत, असे निदर्शनास आल्याने ही बाब समितीच्या कायद्याने बेकायदेशीर आहे. तसेच परस्पर खरेदी व्यवहारामध्ये योग्य दर नसल्याचे, वजनात कपाती, कडती अशा गोष्टी घडत असल्याच्या तक्रारी समितीकडे आल्या आहेत.

कोषास योग्य दर व अचूक वजन देणे, वेळेत पेमेंट न करणे इत्यादी मार्गाने व परस्पर खरेदीमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आल्याने शेतकऱ्यांनी आपला कोष बाहेरील खरेदीदारास न देता कोष बारामती मार्केटमध्येच विक्रीस आणावा. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियम १९६३ कलम ३२ अ अन्वये लायसन्सधारक व अनधिकृत खरेदीदार यांनी परस्पर माल खरेदी करू नये, अन्यथा कोष वाहनासह जप्त करण्यात येईल. ज्यांना रेशीमकोष खरेदी करावयाचे आहेत, त्यांनी परवान्यासाठी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

रेशीमकोष उत्पादक शेतकऱ्यांनी आपली फसवणूक टाळण्यासाठी आपला माल बारामतीच्या रेशीमकोष मार्केटमध्ये विक्रीस आणावा, असे आवाहन बारामती बाजार समितीचे सभापती सुनील पवार, उपसभापती नीलेश लडकत व सचिव अरविंद जगताप यांनी केले.

साप्ताहिक बारामती समाचार
गुरुवार,12 सप्टेंबर 2024
संपादक : स्वप्निल कांबळे मो.9604886068
RNI NO:MAHMAR/2019/79310 · Digital Edition · Email : baramatisamachar@gmail.com · बारामती,पुणे

# बारामती बाजार समितीमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना सुरु

बारामती समाचार न्यूज नेटवर्क




**बारामती:** शेतक-यांचा शेतमाल काढणी हंगाम चालु झाल्या बरोबर मोठ्या प्रमाणात शेतमाल विक्रीसाठी येत असल्याने शेतमालाचे बाजारभाव खाली येऊ शकतात. त्यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होते. सदर शेतमाल साठवणूक करून काही कालावधी नंतर विक्री केल्यास त्या शेतमालाची वाढलेल्या भावाने विक्री होऊन शेतक-यांना जादा दर मिळु शकतो. सदर बाब विचारात घेऊन शेतक-यांना रास्त बाजारभाव मिळावा या दृष्टीकोनातुन बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीने पणन मंडळाने केलेल्या सुचना विचारात घेऊन दरवर्षी प्रमाणे सन 2024-2025 या हंगामा करिता शेतमाल तारण कर्ज योजना सुरू केली आहे. या शेतमाल तारण कर्ज योजनेचा शेतक-यांनी फायदा घ्यावा असे आवाहन सभापती सुनिल पवार व उपसभापती निलेश लडकत यांनी केले आहे. शेतमाल तारण कर्ज योजने अंतर्गत बाजरी, गहु, ज्वारी, उडीद, सोयाबीन इत्यादी शेतीमाल स्विकारला जाईल. यासाठी बाजार समितीच्या अटी व शर्ती लागु राहतील. या योजनेत सहभागी झालेल्या शेतक-यास ठेवलेल्या शेतीमालावर हमीभावा प्रमाणे किंवा चालु बाजारभावानुसार किंमतीचे 50 ते 75 टक्के कर्ज दिले जाईल. सदर तारण कर्ज बाजार समिती मार्फत द.सा.द.शे. 3% व्याजाने धनादेशा द्वारे सहा महिने मुदती करिता दिले जाईल. यासाठी शेतक-यांनी 7/12 उतारा त्यावर चालु हंगामातील पिक नोंद, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स प्रत, मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्रे कार्यालयात जमा करावयाची आहेत. शेतमाल तारण ठेवणे पुर्वी शेतक-यांनी आपला माल यांत्रिक चाळणीवर स्वच्छ केलेला असावा. तसेच सदरचा शेतमाल वाळलेला व गोणपाटाच्या बागदान्यात स्विकारला जाईल. ओलावा असलेला शेतमाल स्विकारला जाणार नाही. सदर योजनेच्या अधिक सविस्तर माहितीसाठी बारामती बाजार समितीच्या कार्यालयाशी संपर्क साधावा अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली.

Chalisgaon, Sept. 2024

# बाजार समित्यांनी उत्पन्नाचे नवनवीन पर्याय निर्माण करावेत- संजय कदम

चाळीसगाव–बाजार समित्यांनी उत्पन्नाचे नवनवीन पर्याय निर्माण करावेत असे आवाहन कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य कृषी उत्पादन मंडळ पुणे चे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले.



जळगाव जिल्ह्यातील सर्व बाजार समिती सचिवांची आढावा बैठक तसेच अडीअडचणी संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी जळगाव बाजार समितीच्या सभागृहात संजय कदम यांच्या अध्यक्षतेखाली सभा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. संजय कदम यांनी जिल्ह्यातील बाजार समिती सचिवांच्या अडचणींची यांची माहिती जाणून घेतली.बाळासाहेब बोरुडे पाचोरा, नितीन पाटील भुसावळ, उन्मेश राठोड अमळनेर, प्रसाद पाटील जामनेर ,जगदिश लोधे चाळीसगाव, स्वप्निल सोनवणे यावल या सचिवांनी आपल्या कामकाजात येणाऱ्या अडचणी या श्री.कदम यांच्यासमोर मांडल्या. या अडीअडचणी लक्षात घेऊन त्यांनी मार्गदर्शन करत निराकरण केले. त्याचप्रमाणे शेतमाल तारण योजना प्रकर्षाने राबवणे बाबतही सूचित केले. जेणेकरून शेतकरी बांधवांना याचा अधिकाधिक फायदा करून घेता येईल.

यावेळी उपसरव्यवस्थापक विभागीय कार्यालय नाशिक श्री. पुरी, हेमंत अतरदे,दीपक शिंदे व गौतम बलसाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जळगाव, महेंद्र गाढे सहकार अधिकारी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जळगाव यांच्यासह जिल्ह्यातील बाजार समित्यांचे सचिव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पुरी यांनी केले तर आभार जळगाव बाजार समितीचे सचिव प्रमोद काळे यांनी मानले.

# कांद्याची निर्यात निम्म्यापर्यंत घसरली

## एप्रिल ते जूनदरम्यानची आकडेवारी; शुल्कामुळे घसरण

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ८ : कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लागू केल्यापासून एप्रिल ते जून या कालावधीत निर्यात निम्म्यापेक्षा खाली आली आहे. निर्यात शुल्क वाढवून किंवा 'नाफेड' व 'एनसीसीएफ'चा कांदा बाजारात उतरवूनही भाव टिकून आहेत. स्थानिक बाजारात सद्यःस्थितीला ३५०० ते ४००० रुपये क्विंटल दर मिळत आहे.

गेल्या वर्षी एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत देशातून २५ लाख २५ हजार टन कांद्याची निर्यात झाली होती. म्हणजेच महिन्याला सरासरी दोन लाख टनापेक्षा जास्त निर्यात झाली. केंद्र सरकारने १९ ऑगस्ट २०२३ रोजी कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लागू केले. त्याचा निर्यातीवर विपरीत परिणाम झाला. तरीही स्थानिक बाजारात कांद्याचे दर कायम असल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने २८ ऑक्टोबर २०२३ रोजी किमान निर्यात मूल्य हे ८०० डॉलर प्रती टन केले. या दोन्ही गोष्टींमुळे निर्यात फारच कमी होऊ लागली. त्यात डिसेंबर २०२३ मध्ये अवकाळी पावसाचा फटका बसला आणि कांद्यासह प्रमुख पिकांचे मोठे नुकसान झाले. केंद्र सरकारने आचारसंहितेच्या काळात म्हणजेच ४ मे २०२४ रोजी किमान निर्यात मूल्य हे ५५० डॉलर प्रती टन इतके कमी केले. त्यामुळे एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या काळात देशातून एक लाख ६२ हजार ७५६ टन कांद्याची निर्यात झाली. यातून ७४४ कोटी रुपयांचे परकीय चलन देशाला मिळाले. यात सर्वाधिक वाटा मलेशिया, युएई, श्रीलंका, बांगलादेश, कुवेत या देशांचा आहे.



“ कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लागू करण्यास एक वर्ष पूर्ण झाले आहे. केंद्र सरकारने १९ ऑगस्ट २०२३ रोजी हे शुल्क लागू केले होते. ऑगस्ट २०२४ संपला तरी हे शुल्क अद्याप हटलेले नाही.

**- भारत दिघोळे,** अध्यक्ष, कांदा उत्पादक शेतकरी संघटना

### कांदा निर्यात (एप्रिल ते जून २०२४)

| देश | टन | परकीय चलन (कोटी रु.) |
|---|---|---|
| मलेशिया | ३६,९४३ | १७२ |
| युएई | ३४,५८५ | १५७ |
| श्रीलंका | ३१,७९७ | १४५ |
| बांगलादेश | १९,३२० | ८५ |
| कुवेत | ६,१८५ | २८ |
| ओमान | ५,०१७ | २२ |
| इंडोनेशिया | ४,६२७ | २१ |
| व्हिएतनाम | ३,८०३ | १७ |
| कतार | ३,६४२ | १६ |
| मालदीव | ३,६५४ | १५ |
| एकूण | १,४९,५७७ | ६८१ |

## टोमॅटोची 'लाली' उतरली

टोमॅटोची आवक वाढल्याने पंधरा दिवसांत दरात ७० ते ८० रुपये प्रतिकिलोमागे घसरण झाली आहे. किरकोळ बाजारात टोमॅटो दहा रुपये किलोप्रमाणे विक्री होऊ लागल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे. नाशिक बाजार समितीमध्ये टोमॅटोची दिवसाला तीन हजार क्विंटलपेक्षा अधिक आवक होते. शनिवारी त्याला २५० ते १७५० रुपये क्विंटलप्रमाणे भाव मिळाला. जूनच्या शेवटी व जुलैच्या सुरुवातीला टोमॅटो चांगला तेजीत होता. जवळपास २८०० ते ४००० रुपये क्विंटलपर्यंत भाव होता.



### भाव घसरण्याची कारणे

- राज्यातील प्रमुख सर्वच बाजार समित्यांमध्ये आवक वाढली
- टोमॅटो नाशवंत असल्याने जास्त काळ साठवणे अशक्य
- मिळेल त्या भावात विक्री करण्याशिवाय पर्याय नाही
- टोमॅटोनंतर दुसरे पीक घेण्याची शेतकऱ्याची तयारी
- समाधानकारक पावसामुळे उत्पादन वाढले
- आवक जास्त, मागणी कमी

Sakal, Dt. 09/09/2024

Punyanagari, Dt. 09/09/2024

# शेतकरी उत्पादक कंपन्यांना बाजार समितीचे सहकार्य

**कोल्हापूर :** कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती ही शेतकरी उत्पादक कंपन्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी-सुविधा तसेच इतर अनुषांगिक बाबींमध्ये कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती पूर्ण क्षमतेने सहकार्य करेल, असे आश्वासन बाजार समितीचे सभापती अॅड. प्रकाश देसाई यांनी दिले. शाहू मार्केट यार्डमध्ये बाजार समितीमध्ये कोल्हापूर व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रवर्तक व प्रतिनिधींच्या आयोजित बैठकीत ते बोलत होते.

**सभापती अॅड. प्रकाश देसाई : शेती उत्पन्न बाजार समितीमध्ये बैठक**

केंद्र शासनाने अल्प भूधारक शेतकऱ्यांचा शेतमाल संकलित करुन बाजारपेठेत नेणे व त्याची विक्री करुन शेतकऱ्यास योग्य मोबदला मिळावा. या हेतूने 'शेतकरी उत्पादक कंपनी' ची निर्मिती केली आहे. त्याप्रमाणे या विविध शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सभासदांकडून संकलीत केलेला शेतमाल बाजारपेठेत विक्री करण्याकरिता बाजार समितींकडून सहकार्य मिळावे, अशी मागणी केली होती. या कंपन्यांच्या मागणीप्रमाणे त्वरीत अनुज्ञप्तीची पुर्तता करुन देत असलेबाबत समिती सचिव जयवंत पाटील यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे प्रतिक गोनुगडे यांनी सदर शेतकरी उत्पादक कंपन्या ह्या केंद्रशासनाच्या ई-नाम योजनेशी संलग्न योजना असल्याने याबाबतीत केंद्राकडून अनुदान तसेच इतर सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे सांगितले. तसेच जिल्ह्यातील इतर शेतकरी उत्पादक कंपन्यांनी बाजार समितीकडे अनुज्ञप्ती घेण्याबाबत आवाहन केले. यावेळी सत्यजित भोसले, रोहित पाटील तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रवर्तक, प्रतिनिधी उपस्थित होते.

Agrowon, Dt. 09/09/2024

# कोल्हापूर बाजार समिती देणार शेतकरी कंपन्यांना परवाने

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

कोल्हापूर : केंद्र सरकारने अल्पभूधारक शेतकऱ्यांचा शेतीमाल संकलित करून बाजारपेठेत नेणे व त्याचे विक्री करून शेतकऱ्यास योग्य मोबदला मिळावा या हेतूने शेतकरी उत्पादक कंपनीची निर्मिती केलेली आहे. अशा कंपन्यांना बाजार समितीतर्फे शेतीमाल खरेदी-विक्रीचे परवाना देण्यात येतील, अशी माहिती सभापती ॲड. प्रकाश देसाई यांनी दिली.

शेतकरी उत्पादक कंपन्यांनी त्यांच्या सभासदांकडून संकलित केलेला शेतीमाल बाजारपेठेत विकण्यासाठी बाजार समितीकडून सहकार्य मागितले होते. या संदर्भात बाजार समितीत बैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रतिनिधींनी शेतीमाल खरेदीसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत सुविधा देण्याची मागणी केली. त्याला बाजार समितीचे सचिव जयवंत पाटील यांनी मान्यता देत परवाने देण्यात येतील, असेही जाहीर केले.

या वेळी राज्य कृषी पणन विभागाचे प्रतीक गोनुगडे म्हणाले, की शेतकरी उत्पादक कंपन्या केंद्र सरकारच्या ई-नाम योजनेशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारकडून अनुदान व अन्य सुविधा देण्यासाठी पणन मंडळाकडून पाठपुरावा सुरू आहे. त्याचाही लाभ शेतकरी सभासदांना होणार आहे. त्यामुळे शेतकरी कंपन्यांनी बाजार समितीकडून परवाने घ्यावेत. या वेळी पणन मंडळाचे सत्यजित भोसले, ई-नामचे रोहित पाटील आदी उपस्थित होते.

Agrowon, Dt. 06/09/2024

# डाळिंबाचा पहिला कंटेनर ऑस्ट्रेलियाला रवाना

## 'पणन'चे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना परदेशी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, पणन मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. पणन मंडळाच्या वाशी (नवी मुंबई) येथील विकिरण सुविधा केंद्रावरून डाळिंबाची पहिली कन्साईंटमेंट विमानमार्गे मेलबर्न येथे पाठविण्यात आल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. तर कल्पा खक्कर (पाथर्डी, जि. नगर) यांच्या अनारनेट या ट्रेसेबिलिटी यंत्रणेमध्ये नोंदणीकृत बागेमधून पुरवठा झाल्याचे कदम यांनी सांगितले.

या बाबत कदम म्हणाले, ''जगात भारताचा डाळिंब उत्पादनाचा पहिला क्रमांक लागत असून २०२३-२४ मध्ये ७२ हजार टन डाळिंबाची निर्यात झाली आहे. २०१७ मध्ये पणन मंडळाने अमेरिकेचे प्रोटोकॉल तयार करून विविध चाचण्या घेत, अमेरिकेला निर्यात यशस्वी केली होती. यानंतर ऑस्ट्रेलियासाठीचे प्रोटोकॉल आणि



**वाशी, नवी मुंबई : येथील पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रातील विकिरण यंत्रणेद्वारे निर्यात करण्यात आलेली डाळिंब.**

चाचण्या सुरू होत्या. या चाचण्यांची यशस्वी रिझल्ट आल्यानंतर ऑस्ट्रेलिया ही आणखी एक महत्त्वाची बाजारपेठ खुली करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. ऑस्ट्रेलियाने २०२० मध्ये भारतातून डाळिंबाच्या निर्यातीसाठी बाजारपेठेत प्रवेश मंजूर केला आहे. भारताने १४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित भारत ऑस्ट्रेलिया द्विपक्षीय योजना तांत्रिक बैठकीत ऑस्ट्रेलियाला निर्यात करणाऱ्या डाळिंब फळांसाठी आंतरराष्ट्रीय कार्य योजना आणि मानक कार्यपद्धतीवर स्वाक्षरी केली आहे. या सर्व प्रक्रिया आणि चाचण्या कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्या तर अपेडाच्या सहकार्यान के. बी. एक्स्पोर्ट यांनी ही कन्साईंटमें पाठविल्याचे निर्यात विभाग प्रमुख सतीश वराडे यांनी सांगितले.

### 'फाइन फूड' प्रदर्शनात होणार मांडणी

महाराष्ट्रातील डाळिंबांची ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या 'फाइन फूड ऑस्ट्रेलिया' या प्रदर्शनामध्ये 'अपेडा'च्या स्टॉलवर सादर करण्यात येणार आहे. हे डाळिंब ग्राहकांना आकर्षित करून भारतीय डाळिंबासाठी ऑस्ट्रेलियन बाजारपेठ काबीज करण्याचे प्रयत्न करण्यात येणार असल्याचे संजय कदम आणि के. बी. एक्स्पोर्टचे संचालक कौशल खट्टर यांनी सांगितले. या यशामुळे, इतर निर्यातदार देखील पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून ऑस्ट्रेलिया येथे डाळिंब निर्यातीसाठी पुढाकार घेतील, अशी अपेक्षा देखील कदम यांनी व्यक्त केली.

### ...हे आहेत प्रमुख डाळिंब उत्पादक जिल्हे

महाराष्ट्रात सोलापूर, नाशिक, नगर, सांगली, पुणे, सातारा, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये डाळिंबाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात आहे. तसेच बुलडाणा, जालना, बीड, औरंगाबाद, जळगांव व धुळे जिल्ह्यांमध्येही क्षेत्र वाढत असून, शेतकऱ्यांना आता पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्राद्वारे निर्यातीसाठी संधी उपलब्ध झाली आहे.

### ...असे होते पॅकिंग

४ किलोच्या बॉक्समध्ये भरून ३२४ बॉक्सेस १ हजार २९६ किलोवर विकिरण प्रक्रिया करण्यात आली.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2024-09-04 | Page- 2
epaper.mahamtb.con

# ऑस्ट्रेलियाला डाळिंबाची पहिली कन्साईनमेंट रवाना

**पुणे** : भारत हा जगातील प्रमुख डाळिंब उत्पादक देश आहे. तर महाराष्ट्र हे प्रमुख डाळिंब उत्पादक राज्य आहे. राज्यात डाळिंबाची लागवड प्रामुख्याने सोलापूर, नाशिक, अहमदनगर, सांगली, पुणे, सातारा, उस्मानाबाद या जिल्ह्यांमधे मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच बुलढाणा, जालना, बीड, औरंगाबाद, जळगांव व धुळे जिल्ह्यांमधेही क्षेत्र वाढत आहे. या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या परिश्रमांमुळे आणि विकिरण सुविधा केंद्राच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने, भारतातील डाळिंब आता ऑस्ट्रेलियन बाजारपेठेत प्रवेश करत आहे. महाराष्ट्र राज्यातील डाळिंब उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एक अभिमानास्पद क्षण आहे. 'कृषि पणन मंडळा'च्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून डाळिंबाची पहिली कन्साईनमेंट विमानमार्गे मेलबॉर्न, ऑस्ट्रेलिया येथे दि. ३१ ऑगस्ट रोजी यशस्वीरित्या रवाना करण्यात आली आहे.

Pudhari, Dt. 04/09/2024

# राज्यातील पहिला फूल लिलाव बाजार पुण्यात बहरणार

**कोल्हापूर : डी. बी. चव्हाण**

फुलांची पणन व्यवस्था बळकट व्हावी, शेतकरी फूलशेतीकडे वळावेत, यासाठी केंद्र सरकारची शेतीमाल निर्यात मार्गदर्शन संस्था (अपेडा) आणि राज्य कृषी पणन मंडळ यांच्या वतीने बंगळूरच्या धर्तीवर तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथे 'फ्लॉवर ऑक्शन सेंटर' (फूल लिलाव बाजार) सुरू करण्यात येणार आहे. यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरू केले आहे.

राज्यातील पहिले फूल लिलाव केंद्र असून, त्याचा लाभ पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर या जिल्ह्यांतील फूल उत्पादक शेतकरी यांना होऊ शकतो. हा बाजार जागेवर लिलावाद्वारे आणि ऑनलाईन लिलाव या दोन पद्धतीने सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील पश्चिम महाराष्ट्रातील फूल उत्पादक शेतकरी, फुले खरेदी करणारे स्थानिक व्यापारी, देशातील व विदेशातील व्यापारी फुले खरेदी करू शकणार आहेत.

कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले म्हणाले, देशात बंगळूरला फुलांचा मोठा बाजार आहे. गुलाब, कमळ यासह जरबेरा, निशिगंध, झेंडू या फुलांचे उत्पादन घेणारे शेतकरी बंगळूर बाजारात आपली फुले घेऊन जातात. आता तळेगाव दाभाडे येथे फुलांचा बाजार झाल्यास

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना या ठिकाणी फुले घेऊन येणे शक्य होणार आहे. दरम्यान, यासंदर्भात पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या अध्यक्षतेखाली तळेगाव परिसरातील फूल उत्पादक शेतकरी यांची बैठक झाली. या बैठकीला 'अपेडा'चे प्रतिनिधी, राज्य शासनाचे प्रतिनिधी उपस्थित होते. हा बाजार सुरू करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. त्यानुसार या बाजाराचा मसुदा तयार करण्याची पान ८ वर ▸

## बंगळूरच्या धर्तीवर तळेगाव दाभाडे येथे होणार केंद्र



### फुलांच्या जाती अशा...

गुलाब, जरबेरा, कार्नेशन, झेंडू, सदाफुली, तुळस, कमळ, अबोली, मधुमालती, बहार, जयफूल, चमेली, निशिगंध, चाफा, रातराणी, गणेश वेल, कर्दळ फुले, ब्रह्मकमळ, आकाश नील, शेवंती आदी जातींची फुले विक्रीसाठी येणार आहेत.

Pudhari, Dt. 04/09/2024

# पहिला फूल लिलाव बाजार पुण्यात बहरणार

(पान १ वरुन)

प्रक्रिया सुरू आहे. याचबरोबर राष्ट्रीय सुगी पश्चात संस्थेतर्फे फूल उत्पादक शेतकऱ्यांना फुलांची काढणी, ग्रेडिंग, बियाणे, रोपे तयार करणे, खते, औषधे यासंबंधी माहिती देणारे केंद्रही तळेगाव येथे सुरू करण्यात येणार असल्याचे डॉ. घुले यांनी सांगितले.


### देशात, राज्यात फूल लागवड क्षेत्र

- **देशात** १ लाख ९२ हजार हेक्टर क्षेत्र
- **महाराष्ट्रात** १७ हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र
- **सांगली** जिल्ह्यात साडेतीनशे हेक्टर क्षेत्र
- **कोल्हापूर** जिल्ह्यात ५० ते ६० हेक्टर क्षेत्र

Maha. Times, Dt. 04/09/2024

# ऑस्ट्रेलियात प्रथमच डाळिंबांची निर्यात

म. टा. प्रतिनिधी, पुणे




कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील केंद्रातून डाळिंबाची पहिली खेप विमान वाहतुकीद्वारे मेलबर्नला (ऑस्ट्रेलिया) नुकतीच रवाना झाली. जगात डाळिंब उत्पादनात अव्वलस्थानी असलेल्या भारताकडून यंदा प्रथमच ऑस्ट्रेलियाला डाळिंबाची निर्यात करण्यात आली आहे.

सन २०२३-२४मध्ये देशातून ७२ हजार टन डाळिंबाची निर्यात झाली. संयुक्त अरब अमिराती, बहारिन, सौदी अरब, श्रीलंका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स आणि नेदरलँड या देशांना भारतातून डाळिंबांची निर्यात होते. सन २०१७मध्ये अमेरिकी बाजारपेठ भारतीय डाळिंबासाठी खुली झाली. जागतिक बाजारपेठेत भारताव्यतिरिक्त स्पेन, इराण या देशांत निर्यातक्षम डाळिंबांचे उत्पादन घेतले जाते.

महाराष्ट्र हे देशातील प्रमुख डाळिंब उत्पादक राज्य आहे. राज्यात डाळिंबाची लागवड प्रामुख्याने सोलापूर, नाशिक, नगर, सांगली, पुणे, सातारा आणि धाराशीव या जिल्ह्यांमधे होते. कृषी पणन मंडळाचे संचालक संजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या पाठपुराव्यामुळे वाशी येथील केंद्रात डाळिंबाची चाचणी करण्यात आली. त्यानंतर एक हजार २९६ किलोचे एकूण ३२४ बॉक्स मेलबर्नला रवाना करण्यात आले.

Lokmat, Dt. 04/09/2024

# बाजार समितीच्या सचिवांसाठी लातुरात एक दिवसीय कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने लातूर विभागातील बाजार समितींच्या सचिवांची शेतमाल तारण कर्ज योजना या विषयी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी उपव्यवस्थापक महादेव बरडे, यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

शेतकऱ्यांसाठी बाजार समितींमार्फत राबविण्यात येणाऱ्या पणन मंडळाच्या शेतमाल तारण कर्ज योजनेचे महत्त, प्रचार प्रसिध्दी, योजनेची अंमलबजावणीविषयी मार्गदर्शन केले. न्यू इंडिया अॅश्युरन्स कं. लि. च्या विभागीय व्यवस्थापिका शारदा मांडवेकर यांनी गोदाम व गोदामातील शेतमालाचा विमाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. नीलेश लांडे, विभागीय व्यवस्थापक, म. रा. वखार महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांनी गोदामातील शेतमालाची साठवणूक, वखार पावतीवरील कर्ज याबाबत माहिती दिली. शिवानंद राठोड यांनी केंद्र शासनाच्या गोदाम विकास आणि नियामक प्राधिकरणाकडे गोदामाची नोंदणीचे महत्त्व, फायदे व नोंदणी कशी करावयाची याची माहिती दिली.

यावेळी पणन मंडळाचे विभागीय कार्यालयाचे व्यवस्थापक राहुल गोरे यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेची माहिती पणन मंडळाच्या ई.आर.पी. प्रणालीमध्ये भरणा करण्याविषयी उपस्थिताना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र सहकार विकास महासंघाचे प्रशांत चासकर यांनी गोदामातील शेतमालाचे साठवणुकीचे महत्त्व, प्राथमिक प्रक्रिया उद्योग, मूल्य साखळी महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

- वखार महामंडळाचे व्यवस्थापक सुरेश माने यांनी गोदामामध्ये शेतमालाची साठवणूक करताना कोणती काळजी घेणे आवश्यक आहे, गोदामातील शेतमालचे संरक्षणासाठीच्या उपाययोजना, शेतमालाची थप्पी लावताना काय काळजी घ्यावी या विषयी प्रात्यक्षिकासह उपस्थितांना माहिती दिली. बाजार समितीचे भास्कर शिंदे यांनी बाजार समितींमार्फत राबविलेल्या शेतमाल तारण कर्ज योजनेची व आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली.

पुण्य नगरी

# पणन मंडळाच्या सुविधा केंद्रावरून डाळिंब चालले ऑस्ट्रेलियाला

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून ऑस्ट्रेलिया येथे डाळिंब रवाना झाले. विमानमार्गे मेलबोर्न, ऑस्ट्रेलिया येथे हे डाळिंब पाठविले. महाराष्ट्र राज्यातील डाळिंब उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा एक अभिमानास्पद क्षण आहे. जगात भारताचा डाळिंब उत्पादनात पहिला क्रमांक लागत असून, सन २०२३-२४ मध्ये ७२ हजार मे. टन डाळिंबाची निर्यात झाली आहे.

भारतातून डाळिंब निर्यात ही प्रामुख्याने संयुक्त अरब अमिराती, बहारीन, सौदी, श्रीलंका इ. देशांना केली जाते. तसेच युरोपियन देशांमध्ये इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, नेदरलँड या देशांमध्ये निर्यात होते. जागतिक बाजारपेठेत भारताव्यतिरिक्त स्पेन व इराण या देशांमध्येच निर्यातक्षम डाळिंब उत्पादित केले जाते. डाळिंबामध्ये विशेष औषधी गुणधर्म असल्याने त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढत आहे. अमेरिकादेखील डाळिंबासाठी मोठी बाजारपेठ आहे. ही बाब ही विचारात घेता २०१७ मध्ये अमेरिकन बाजारपेठ भारतीय डाळिंबासाठी खुली झाली. अमेरिका आणि इतर बाजारपेठांनंतर ऑस्ट्रेलिया ही आणखी एक महत्त्वाची बाजारपेठ खुली करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. ऑस्ट्रेलियाने २०२० मध्ये भारतातून डाळिंबाच्या निर्यातीसाठी बाजारपेठेत प्रवेश मंजूर केला आहे.



डाळिंबाच्या विकिरण प्रक्रियेच्या चाचण्या कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या मार्गदर्शनाने व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या पाठपुराव्यामुळे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. अपेडाच्या सहकार्याने मे. के. बी. एक्सपोर्ट यांनी ऑस्ट्रेलियामध्ये पहिले कन्साइन्मेंट पाठविण्याचा मानस व्यक्त केला. डाळिंब कंटेनरसाठी के.बी. एक्सपोर्ट यांचे पॅकहाउस येथे डाळिंबाची प्रतवारी करून त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर डाळिंब चार किलोच्या बॉक्समध्ये भरून त्यावर विकिरण सुविधा केंद्रात आणि एन.पी.पी.ओ. यांच्या अधिकाऱ्यांच्या तपासणीनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. डाळिंबाच्या ३२४ बॉक्सेसमधील १२९६ किलोवर विकिरण प्रक्रिया करून विमानमार्गे ऑस्ट्रेलियाला पाठविण्यात आले. नगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील शेतकरी कल्पा खक्कर यांच्या अनारनेट या ट्रेसेबिलिटी यंत्रणेमध्ये नोंदणीकृत बागेमधून डाळिंबाचा पुरवठा करण्यात आला आहे.

डाळिंब ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या फाइन फूड ऑस्ट्रेलिया या प्रदर्शनामध्ये अपेडामार्फत प्रदर्शित केले जाणार असून, विविध ग्राहकांना आकर्षित करून भारतीय डाळिंबासाठी ऑस्ट्रेलियन बाजारपेठ काबीज करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत.

भारतीय डाळिंबांनी ही बाजारपेठ काबीज केल्यानंतर डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचे के. बी. एक्सपोर्टचे संचालक कौशल खट्टर यांनी सांगितले. या यशामुळे इतर निर्यातदारदेखील कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावरून ऑस्ट्रेलिया येथे डाळिंब निर्यातीसाठी पुढाकार घेतील, अशी अपेक्षा कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी व्यक्त केली आहे.

## भारत जगातील प्रमुख डाळिंब उत्पादक

भारत हा जगातील प्रमुख डाळिंब उत्पादक देश आहे. तर, महाराष्ट्र हे प्रमुख डाळिंब उत्पादक राज्य आहे. राज्यात डाळिंबाची लागवड प्रामुख्याने सोलापूर, नाशिक, अहमदनगर, सांगली, पुणे, सातारा, उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच बुलढाणा, जालना, बीड, औरंगाबाद, जळगाव व धुळे जिल्ह्यांमध्येही क्षेत्र वाढत आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# बाजार समित्यांच्या प्रश्नांवर गुरुवारी राज्यस्तरीय परिषद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या प्रश्नांवर चर्चा करून काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या संयुक्त विद्यमाने केले आहे. येत्या गुरुवारी (दि.३ ऑक्टोबर) रोजी याबाबतची परिषद निगडीतील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात दुपारी दोन वाजता आयोजित केली आहे.

या परिषदेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह पणनमंत्री अब्दुल सत्तार, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी सव्वातीन वाजता पणनमंत्री सत्तार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार असून बाजार समित्यांचे सभापती, सचिवांकडून त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि उपाययोजना मांडल्या जातील.

राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांच्यासह पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे हे सुद्धा उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

या बाबत बाजार समिती संघाचे व्यवस्थापकीय संचालक किशोर कुलकर्णी म्हणाले, बाजार समित्यांना स्पर्धात्मक वातावरणासाठी खासगी बाजार, थेट पणन परवाने दिले. मात्र, त्याचा परिणाम बाजार आवारातील शेतमालाच्या आवकवर झाला असून, स्पर्धा झालेली नसल्याने खासगी बाजारांनाही बाजार समित्यांसारख्याच अटी व शर्ती लागू कराव्यात, अशी आमची मागणी आहे.

'बाजार फी'चा (मार्केट सेस) दर शेकडा एक रुपया पाच पैसे आहे. अन्य राज्यांत तो दोन रुपये असल्याने एवढाच दर राज्यात करावा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायतीच्या करातून बाजार समित्यांना सूट द्यावी. कारण अडते, व्यापारी, शेतकरी व बाजार घटकांना देणाऱ्या सुविधा बाजार समिती पुरविते. बिगर शेतसारा माफ करावा, स्वस्त धान्य दुकानातील मालविक्रीवर बाजार फी समित्यांना मिळावी, अशीही आमची मागणी आहे.

## खर्च मंजुरीच्या १२ (१) अधिकाराचे हवे विकेंद्रीकरण

पणन संचालकांना कायद्यान्वये असलेल्या विविध विकासकामांच्या खर्च मंजुरीचे बाजार समिती कायद्यातील कलम १२ (१) च्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करून सहाय्यक निबंधक, तालुका निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधकांच्या खर्च मंजुरीच्या रक्कमेची मर्यादा वाढवावी. योग्य तो ऊहापोह होऊन निर्णय होण्याची अपेक्षा असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

# ऑस्ट्रेलियाला प्रथमच डाळिंबाची हवाईमार्गे निर्यात

## ३२४ बॉक्समधून भगव्या जातीची डाळिंबे मेलबोर्नला पाठवली : पाथर्डीतील महिला शेतकऱ्यांच्या शेतातील डाळिंबाचा समावेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्य कृषी पणन मंडळ, केंद्राच्या अपेडा आणि एनपीपीओ संस्थेच्या संयुक्त प्रयत्नाने मंडळाच्या मुंबईतील वाशीमधील विकिरण सुविधा केंद्रावरून ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न येथे प्रथमच भगव्या जातीच्या डाळिंबाची सुमारे तेराशे किलोंइतकी निर्यात हवाईमार्गे ३१ ऑगस्ट रोजी करण्यात आली. राज्यातील शेतकऱ्यांच्या परिश्रमांमुळे आणि विकिरण सुविधा केंद्राच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीमुळेच हे शक्य झाल्याचे पणन मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले.**

निर्यातक्षम डाळिंब ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या 'फाईन फूड ऑस्ट्रेलिया' या प्रदर्शनामध्ये अपेडामार्फत प्रदर्शित केले जाणार आहे. त्यामुळे तेथील ग्राहकांना आकर्षित करून भारतीय डाळिंबासाठी ऑस्ट्रेलियन बाजारपेठ काबीज करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. अपेडाच्या सहकार्याने मे. के. बी. एक्सपोर्ट यांनी ऑस्ट्रेलियामध्ये पहिले कन्साईनमेंट पाठविण्याचा मानस व्यक्त केला. त्यांच्या पॅकहाऊस येथे डाळिंबाची प्रतवारी करून त्यावर निश्चित केलेल्या प्रणालीनुसार प्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर हे डाळिंब चार किलोच्या बॉक्समध्ये भरून त्यावर विकिरण सुविधा केंद्रात आणि केंद्र सरकारच्या नॅशनल प्लांट प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन ऑफ इंडियाच्या (एन.पी.पी.ओ.) अधिकाऱ्यांच्या तपासणीअंती व मान्यतेनंतर डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली.

डाळिंबाच्या ३२४ बॉक्सेसमधील सुमारे एक हजार २९६ किलो डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करण्यात आली. पाथर्डीतील महिला शेतकरी कल्पा खक्कर (जि. अहमदनगर) यांच्या अनारनेट या ट्रेसेबिलिटी यंत्रणेमध्ये नोंदणीकृत बागेमधून निर्यातीसाठीच्या डाळिंबाचा पुरवठा करण्यात आला आहे. वाशी येथील डाळिंब विकिरण प्रक्रियेच्या चाचण्या पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांच्या मार्गदर्शनाने व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या पाठपुराव्यामुळे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या. राज्यात डाळिंबाची लागवड प्रामुख्याने सोलापूर, नाशिक, अहमदनगर, सांगली, पुणे, सातारा उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. तसेच, बुलढाणा, जालना, बीड, औरंगाबाद, जळगाव व धुळे जिल्ह्यांमध्येही डाळिंबाचे क्षेत्र वाढत आहे.



**पणन मंडळ, केंद्राच्या अपेडा, एनपीपीओ संस्थेच्या संयुक्त प्रयत्नाला यश**

**पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधेचा लाभ घेऊन भगव्या जातीच्या डाळिंबाची प्रथमच मेलबोर्न येथे निर्यात करण्यात आली.**

"जगात भारताचा डाळिंब उत्पादनात पहिला क्रमांक लागत असून सन २०२३-२४ मध्ये देशातून ७२ हजार मेट्रिक टन डाळिंब निर्यात झाली. ही निर्यात प्रामुख्याने संयुक्त अरब अमिराती, बहरीन, सौदी, श्रीलंका आदी देशांना केली जाते. तसेच, युरोपीयन देशांमध्ये इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, नेदरलँड या देशांमध्ये निर्यात होत आहे. जागतिक बाजारपेठेत भारताव्यतिरिक्त स्पेन व इराण या देशांमध्येही निर्यातक्षम डाळिंब उत्पादित केले जाते. डाळिंबामध्ये विशेष औषधी गुणधर्म असल्याने त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढत आहे.

**- संजय कदम,**
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,पुणे

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शेतमाल तारणातून शेतकऱ्यांना ३६ कोटींचे कर्ज



पुढारी वॉच

- राज्य कृषी पणन मंडळाच्या योजनेत ६७ बाजार समित्यांचा सहभाग
- सुमारे दोन लाख ७७ हजार क्विंटलपेक्षा अधिक शेतमाल तारणात

**शेतमाल तारण योजनेतील मागील तीन वर्षात तारणात ठेवलेल्या शेतमालावर कर्ज वाटप स्थिती**

| वर्ष | वजन क्विंटल | तारण कर्जवाटप रक्कम (कोटीत) |
|---|---|---|
| २०२१-२२ | २,२३,५३२ | ५७.६७ |
| २०२२-२३ | १,८२,२१८ | ५०.३६ |
| २०२३-२४ | २,७७,६५० | ३६.३५ |

“ शेतमाल तारण कर्ज योजनेमुळे राज्यातील शेतमालास वाढीव बाजारभाव मिळाल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा शेतकऱ्यांना होत आहे. शिवाय बाजार समित्यांच्या उत्पन्नातही वाढ होत असल्याने या योजनेस शेतकरी व बाजार समित्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे. पणन मंडळामार्फत या योजनेसाठी एक स्वतंत्र संगणक प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे बाजार समित्या मंडळाकडे त्वरित प्रस्ताव सादर करू शकत असल्याने योजनेमध्ये अधिक गतिमानता आली आहे.

- **संजय कदम,** कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ, पुणे.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या २०२३-२४ या संपणाऱ्या हंगामामध्ये राज्यातील ६७ बाजार समित्यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेत सहभाग घेतला. त्यामध्ये सुमारे दोन लाख ७७ हजार क्विंटलपेक्षा जास्त शेतमाल तारणात स्वीकारला. त्यावर एकूण ३६ कोटी ३४ लाख २४ हजार रुपयांइतक्या कर्जाचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. हंगामामध्ये बाजारभाव सर्वसाधारण समाधानकारक राहिल्याने शेतकऱ्यांनी शेतमाल तारण योजनेत कमी सहभाग नोंदविल्याचे आढळून आले आहे.

गतवर्षी योजनेत प्रामुख्याने भात, मका, हरभरा व तूर या पिकांसह एकूण १७ शेतमालांवर कर्जवाटप करण्यात आले. जे मागील हंगाम २०२२-२३ मध्ये सुमारे १४ कोटी आणि २०२१-२२ च्या तुलनेत २१ कोटी रुपयांनी शेतमाल तारण कर्ज वाटप कमी प्रमाणात झाल्याचे स्पष्ट झाल्याची माहिती पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी दिली.

ते म्हणाले, राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाचे काढणी हंगामात उतरत्या बाजारभावामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळून शेतकऱ्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी पणन मंडळाने बाजार समित्यांमार्फत योजना सक्षमपणे चालविली आहे. दरवर्षी ही योजना ऑक्टोबर ते सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येते. योजनेअंतर्गत बाजार समिती अथवा वखार महामंडळाच्या गोदामात ठेवलेल्या शेतमालाच्या एकूण किंमतीच्या ७५ टक्क्यांपर्यंतची रक्कम सहा महिने कालावधीसाठी सहा टक्के व्याजदराने शेतकऱ्यांना तारण कर्ज स्वरुपात बाजार समित्यांमार्फत त्वरित उपलब्ध करून देण्यात येते. तसेच सहा महिन्यांचे आत ज्या बाजार समित्या तारण कर्जाची परतफेड करतात, अशा समित्यांना तीन टक्के व्याज सवलत पणन मंडळाकडून दिली जाते.

पुण्य नगरी

# संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी योजनेच्या प्रस्तावास १७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**पुणे** : राज्य शासनाच्या आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी योजनेंतर्गत प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारणीबाबत प्रस्ताव मागणीची मुदत १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

राज्य शासनाने राज्यातील नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि. नागपूर), मोर्शी (जि. अमरावती) व संग्रामपूर (जि. बुलढाणा) येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी योजनेस मान्यता देऊन २० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. योजनेच्या लाभार्थींमध्ये सहकारी प्रक्रिया संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, खासगी उद्योजक आणि बाजार समिती यांचा समावेश आहे. यापैकी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने पहिल्या टप्प्यात प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पाकरिता लाभार्थी निवडीची प्रक्रिया सुरू केली होती. प्राथमिक प्रक्रिया प्रकल्पात पॅक हाऊस, संत्रा ग्रेडिंग लाइन, प्रीकूलिंग, कोल्ड स्टोअरेज इ. सुविधांचा समावेश आहे. अंदाजित खर्च ४ कोटी रुपये अपेक्षित आहे.

या प्रकल्पाकरिता प्रथमतः लाभार्थ्यांनी १५ टक्के स्वनिधी व उर्वरित ८५ टक्के निधी बँकेकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध करून प्रकल्प उभारणी पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून प्रकल्पाच्या अंदाजित किमतीच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे किंवा कमाल रक्कम २ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येणार असून, हे अनुदान लाभार्थ्यांच्या कर्ज खाती जमा करण्यात येईल. या प्रकल्पाकरिता प्रस्ताव मागवण्याकरिताची निविदा तसेच मॉडेल प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ सप्टेंबर होती; ती आता वाढवण्यात आली असून १७ सप्टेंबर करण्यात आली आहे. त्याबाबतची सूचना पणन मंडळाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ संबंधित तालुक्यातील लाभार्थ्यांनी घ्यावा व या योजनेच्या अधिक माहितीकरिता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुख्यालयातील प्रकल्प विभागात संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले आहे.

Pune Edition Edition
Sep 01, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com